द ग्लोबल टाइम्स
मराठी दैनिक
भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब
मुंबई ■ अंक : १०७ ■ वर्ष : १२
Register No. : RNI - MAHMAR /2012/44621
Web Site : www.theglobaltime.com ■ सोमवार दि. २९ एप्रिल २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹३.००

# विवेकानंदमार्फत इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरूकता अभियान संपन्न



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील वाणिज्य विभागामार्फत ११ मार्च ते २० एप्रिल या कालावधीत इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरूकता अभियान राबविण्यात आले. यामध्ये सध्याच्या इलेक्ट्रॉनिक कॉमर्स अंतर्गत येणाऱ्या विविध गोष्टींमुळे सर्वसामान्य नागरिकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी करणे गरजेचे आहे, यासंदर्भात परिसरामार्फत बी. कॉम भाग-२ व बी. कॉम भाग-३ च्या विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. यामध्ये एटीएम/ डेबिट / क्रेडिट कार्ड वापरताना कोणती दक्षता घ्यावी, मोबाईल बँकिंग व इंटरनेट बँकिंग वापरताना कोणती दक्षता घ्यावी, सोशल मीडियाचा वापर व सायबर गुन्हेगारीबद्दल घ्यावयाची काळजी तसेच नागरिकांनी ऑनलाईन आर्थिक फसवणूक झाल्यास आपली तक्रार कोठे नोंदवावी याविषयी सविस्तर माहिती या अभियानांतर्गत देण्यात आली. अभियानांतर्गत कोल्हापूर शहर व जिल्ह्यातील ५६ गावातील १३०० पेक्षा जास्त कुटुंबामध्ये जनजागृती केली. या अभियानाचे समन्वयक म्हणून डॉ. उमेश दबडे यांनी काम पहिले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. रवी कांबळे, डॉ. अमोल मोहिते, डॉ. योगेश माने यांचे सहकार्य लाभले.

29/04/2024

30.4.24

# विवेकानंद कॉलेजच्या विक्रांत सुर्वेला विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक



**कोल्हापूर** : वारणानगर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजचे विक्रांत राजेंद्र सुर्वे (बी.एस्सी. भाग २) याला रौप्यपदक प्राप्त झाले. याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्यावतीने गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या यशाबद्दल विक्रांत सुर्वे यांचा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कॉलेजचे रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

विक्रांत सुर्वे याला जिमखाना विभाग प्रमुख हवालदार, प्रा. एस. आर. सणगर, प्रा. मोहित करवडे, प्रा. संतोष कुंडले, प्रा. सचिन पठाण, सुरेश कापसे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.

लोकमत
गुरुवार ११.४.२०२४

# शुभांगी चव्हाण पोलिस उपनिरीक्षक

पोहाळे तर्फ आळते : कुशिरे तर्फ ठाणे येथील



शुभांगी राजाराम चव्हाण हिने पहिल्या प्रयत्नात कोणत्याही खासगी क्लासशिवाय पोलिस उपनिरीक्षकपदी यश संपादन केले. ओबीसीमध्ये मुलींत राज्यात तिसरा क्रमांक तिने पटकावला. शुभांगीचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण नवनाथ हायस्कूल पोहाळे, तर विवेकानंद कॉलेज येथून तिने पदवीचे शिक्षण पूर्ण केले. तिच्या वडिलांचा सलूनचा व्यवसाय होता. १४ वर्षांपूर्वी वडिलांचे निधन झाले. आई आणि भाऊ यांच्या पाठबळामुळे तिने यश प्राप्त केले.

२ पुण्य नगरी ■ सोमवार, १५ एप्रिल २०२४

**विवेकानंद कॉलेज :** विवेकानंद महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. आभार डॉ. दादासाहेब घाडगे यांनी मानले. दरम्यान, ग्रंथालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील आधारित ग्रंथांचे प्रदर्शन मांडले आहे. समाजशास्त्र व राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यक्रमास रजिस्ट्रार आर. बी. जोग, एनसीसी प्रमुख कॅप्टन सुनीता भोसले, लेप्टनंट प्रा. जे. आर. भरमगोंडा, डॉ. कैलास पाटील, डॉ. संजय अंकुशराव, प्रा. एम. ए. कुरणे आदी उपस्थित होते.

15/04/24

15/4/24

पुण्यनगरी
दि. 17/04/2024

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल विभागाकडून दि. १२ ते १४ एप्रिलदरम्यान प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले. विविध क्षेत्रांतील एकूण १२ कंपन्यांसाठी विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या व यामध्ये महाविद्यालयातील एकूण ३२७ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड झाली. विद्यार्थ्यांचे कार्याध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे, सचिव प्रा. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, प्रा. सतीश चव्हाण, संजय थोरात, डॉ. संजय लठ्ठे, राजश्री पाटील, प्रा. विजय पुजारी, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. पल्लवी देसाई, राहुल इंगवले यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. अजय मस्के, प्रा. आर. आर. माने, विवेकानंद कॉलेजचे रजिस्ट्रार आर. बी. जोग, प्रा. संदीप पाटील व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

.4.24



फरहान जमादार  आशीष पाटील  वृषाली कांबळे

# 'यूपीएससी'त कोल्हापूरचा डंका

## जिल्ह्यातील पाच परीक्षार्थींना यश

कोल्हापूर : प्रतिनिधी

केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या नागरी २०२३ मुख्य परीक्षेचा निकाल मंगळवारी दुपारी जाहीर झाला. यात कोल्हापूरच्या पाच जणांनी घवघवीत यश मिळवले. आजरा तालुक्यातील उत्तूर गावची वृषाली कांबळे, आदित्य बामणे, शाहूवाडीतील साळशी गावचे आशीष पाटील, जयसिंगपूर येथील आदिती चौगुले आणि शहरातील फरहान जमादार यांनी कोल्हापूरचे नाव देशभर नेले.

उत्तूर येथील वृषाली संतराम कांबळे हिने देशभरात ३१० वी रँक घेऊन यूपीएससी परीक्षेत उज्ज्वल यश मिळवले. विशेष म्हणजे वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी आणि पहिल्याच प्रयत्नात ती यशस्वी झाली. वृषालीने पॉलिटिकल सायन्स घेऊन बी.ए. पूर्ण केले आहे. मुंबई येथील सेंट झेविअर्स कॉलेज येथे तिचे शिक्षण झाले आहे. शाहूवाडी तालुक्यातील साळशी गावचे सुपुत्र आशीष पाटील यांनी १४७ व्या रँकने आयएएस प्राप्त करून सलग तिसऱ्या वर्षी यशाला गवसणी घातली. ते सध्या दिल्ली, दीव-दमण या केंद्रशासित प्रदेशात उपजिल्हाधिकारी म्हणून काम पाहत होते. यापूर्वी त्यांनी २०२२ मध्ये ४६३, तर २०२१ मध्ये ५६३ व्या रँकने यश मिळवले होते. शहरातील ताराबाई पार्क परिसरातील फरहान जमादार याने १९१ वा रँक मिळवत उज्ज्वल यश मिळवले. त्याचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण कदमवाडी येथील सुसंस्कार हायस्कूल येथे झाले. विवेकानंद कॉलेजमध्ये बारावी, तर सांगलीतील वालचंद कॉलेजमधून्ततता कॉम्प्युटर सायन्समधून इंजिनिअरची पदवी घेतली.

### दररोज १३ तास अभ्यास केला

यूपीएसी पार करायचीच, हा चंग मी कॉलेज जीवनापासूनच बांधला होता. त्यानुसार मी मेहनत घेतली होती. त्यासाठी दिवसातून १३ तास अभ्यास करत होते. माझ्या यशात आई, वडील, बार्टी संस्था, शिक्षकांचे सहकार्य लाभले.

– वृषाली कांबळे

18/04/24

18.4.24

पुण्य नगरी ▮ रविवार, २८ एप्रिल २०२४



# 'विवेकानंद'मध्ये शेक्सपियर जयंती कार्यक्रम

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातर्फे प्रसिद्ध नाटककार व कवी विल्यम शेक्सपियर यांच्या जयंतीनिमित्त 'ए ट्रिब्यूट टू विल्यम शेक्सपियर' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. या कार्यक्रमात रितेश प्रजापती, मुस्कान मुल्ला, करण पाटील, समृद्धी कुलकर्णी, रश्मिता गौडा, साक्षी बगाडे, राजश्री शितोळे, वैष्णवी पवार या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्टाफ सेक्रेटरी प्रा. शिल्पा भोसले, कला व वाणिज्य विभागप्रमुख प्रा. उज्ज्वला हिरकुडे, अश्विनी गायकवाड-माने, माधवी देशपांडे आदींचे सहकार्य लाभले.



# 'ई-कॉमर्स' जागरुकता अभियान उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज अधिकारप्रदत्त स्वायत्त) मधील वाणिज्य विभागामार्फत दि. १९ मार्च ते २५ एप्रिल या कालावधीत इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरुकता अभियान राबवण्यात आले. यामध्ये सध्याच्या इलेक्ट्रॉनिक कॉमर्स अंतर्गत येणाऱ्या विभिन्न गोष्टीमुळे सर्वसामान्य नागरिकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी करणे गरजेचे आहे, यासंदर्भात परिपत्रकामार्फत बी.कॉम भाग-२ आणि भाग-३ च्या विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. यामध्ये शहरासह जिल्ह्यातील ५६ गावांतील १३०० पेक्षा जास्त कुटुंबांमध्ये जनजागृती केली. या अभियानाचे समन्वयक म्हणून डॉ. उमेश दबडे यांनी काम पाहिले, तसेच प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सनी काळे, डॉ. अमोल मोहिते, डॉ. योगेश माने यांचे सहकार्य लाभले.

29/04/2024

29.4.24

पुढारी कोल्हापूर, बुधवार, १७ एप्रिल २०२४

# बुक बायंडरचा मुलगा बनला कलेक्टर

## मनपा शाळेतून शिक्षणाचा श्रीगणेशा : जमादार कुटुंबीयांत आनंदोत्सव

**कोल्हापूर : सुनील सकटे**

प्रारंभी खिळे जुळविण्याचे काम करणाऱ्या व सध्या बुक बायंडरचा व्यवसाय करणाऱ्या इरफान अल्लाबक्ष जमादार यांच्या फरहान जमादार याने खडतर केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन कलेक्टरपदाला गवसणी घातली. मुस्लिम समाजातील या मुलाने तरुण पिढीसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

शाहूपुरी घोरपडे गल्लीत दहा बाय दहाच्या खोलीत संसार थाटलेल्या जमादार यांना फरहान व फरदीन ही दोन मुले. खिळे जुळणीच्या व्यवसायातून आई, पत्नी व दोन मुलांचा सांभाळ केला. फरहानने चौथीपर्यंतचे शिक्षण महापालिकेच्या एस्तेर पॅटर्न शाळेत घेतले. पाचवी ते आठवीपर्यंत दादासाहेब मगदूम हायस्कूल व नववी-दहावी सुसंस्कार हायस्कूल, कदमवाडी येथे घेतले. ११ वी आणि १२ वी विवेकानंद कॉलेजमधून पूर्ण करून बी.टेक.साठी सांगलीच्या वालचंद कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. परिस्थितीची जाणीव असल्याने आजही फरहान सायकलचा वापर करतो.



कोल्हापूर : फरहान याला पेढा भरवताना कुटुंबीय.

पदवीनंतर स्पर्धा परीक्षेला सामोरे गेल्यानंतर पहिल्या प्रयत्नात अपयश आले; मात्र खचून न जाता त्याने पुन्हा दोनवेळा परीक्षा दिली. सलग तीनवेळा अपयश आल्याने स्पर्धा परीक्षेचा नाद सोडण्याचा विचार केला; मात्र आई-वडील आणि मित्रांच्या प्रोत्साहनामुळे त्याने चौथा प्रयत्न केला. या प्रयत्नात मात्र त्याने यशाला गवसणी घातली. एवढेच नाही, तर देशात १९१ वा क्रमांक मिळविला. लेखी परीक्षा पास झाल्यानंतर त्याने वर्षभर दिल्लीत तळ ठोकला. त्यावेळी कुटुंबीयांसह नातेवाईक, मित्रांनी त्याला मदतीचा हात दिला.

### मुलाने जिद्द दाखवली

या यशाबद्दल बोलताना फरहानने कलेक्टर होण्याची इच्छा व्यक्त केली. सर्वसामान्य कुटुंबातून आल्याने या पदाचा सर्वसामान्यांना कसा उपयोग होईल हेच नेहमी पाहीन, असे फरहानने सांगितले. मुलाचे कौतुक करताना आई शमीम व वडील इरफान यांना आनंदाश्रू आवरले नाहीत. मुलाने जिद्द दाखविली, हे सांगताना दोघेही भावनाविवश झाले.

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, १९ एप्रिल २०२४

# विवेकानंद कॉलेजच्या ३२७ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय (अधिकारप्रदत्त स्वायत्त) कोल्हापूरच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल विभागाकडून प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले. विविध क्षेत्रांतील १२ कंपन्यासाठी विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. यामध्ये ३२७ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड झाली आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्रा. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्लेसमेंट ड्राईव्हसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर आर कुंभार व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे प्रमुख डॉ. श्रुती जोशी, ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. सतीश चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, २० एप्रिल २०२४

# कुशिरे येथील शुभांगी चव्हाण पीएसआयपदी



**पोहाळे तर्फ आळते :** कुशिरे (ता. पन्हाळा) येथील येथील शुभांगी राजाराम चव्हाण यांची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झाली. २०२१ मध्ये दिलेल्या एमपीएससी परीक्षेतून हे यश मिळवले. इतर मागास वर्गात मुलींमध्ये तिने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला. कोणत्याही क्लासशिवाय स्वअध्ययनातून प्रथम प्रयत्नात तिने हे यश मिळवले. शुभांगीचे प्राथमिक शिक्षण कुशिरे येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण नवनाथ हायस्कूल पोहाळे, तर विवेकानंद कॉलेज येथून तिने पदवीचे शिक्षण पूर्ण केले. तिच्या वडिलांचा सलूनचा व्यवसाय होता. १४ वर्षांपूर्वी वडिलांचे निधन झाले. आई आणि भाऊ यांच्या पाठबळावर तिने हे यश मिळवले.

# 'पीएसआय' परीक्षेत नेर्लीची राखी कांबळे मागासवर्गीयांतून राज्यात पहिली

## परीक्षेचा निकाल जाहीर; ३७८ पदांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षकपदाच्या परीक्षेत नेर्ली (ता. करवीर) येथील राखी रमेश कांबळे हिने अनुसूचित जातीमधील महिला प्रवर्गामध्ये राज्यात पहिला क्रमांक पटकावला.

एमपीएससीच्या वतीने पोलिस उपनिरीक्षकपदासाठीच्या ३७८ जागांसाठी ऑक्टोबर २०२१ मध्ये जाहिरात निघाली. फेब्रुवारी २०२२ मध्ये पूर्व व ९ जुलै, २०२३ रोजी मुख्य परीक्षा झाली. त्यानंतर २ ते १० नोव्हेंबरदरम्यान शारीरिक चाचणी झाली. त्यानंतर मुलाखती झाल्या. बुधवारी सायंकाळी राज्य लोकसेवा आयोगाने निकाल जाहीर केला. राखी कांबळे ही नेर्ली येथील आहे. तिने पहिल्याच प्रयत्नात कोणत्याही खासगी क्लासशिवाय यश संपादित केले आहे. राखीचे प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर नेर्ली येथे, तर माध्यमिक शिक्षण नेर्ली विद्यालयातून झाले. महाविद्यालयीन शिक्षण शिवाजी विद्यापीठातून घेत अभियंता पदवी मिळवली. वडिलांनी प्रशासकीय सेवेचे ध्येय उराशी बांधून जो यशाचे शिखर गाठण्याचा मार्ग मुलीला दाखवला, त्या यशाच्या अटकेपार झेंडा फडकून वडिलांना तिने खरी श्रद्धांजली अर्पण केली आहे.



राखी कांबळे



आरती कणिरे

आरती जीवनधर कणिरे (मूळ रा. इंगळी, ता. हातकणंगले) हिने पोलिस उपनिरीक्षकपदाच्या परीक्षेत खुल्या प्रवर्गातून १२ वी रँक मिळवली. तिने कन्या मंदिर इंगळी येथे प्राथमिक, त्यानंतर न्यू इंग्लिश स्कूल, इंगळी येथे माध्यमिक, नंतर उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद महाविद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्रातून एमबीए, एम.कॉम. पूर्ण केले. सध्या केएमसी महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. कुटुंब सांभाळून हे पद मिळवले. याशिवाय जिल्ह्यातील शिवानी पाटील (कोल्हापूर), विनया मराठे (वडणगे), शुभांगी चव्हाण (केर्ली), प्रियंका पाटील (चंदगड), स्नेहा शिर्के (कळंबा), प्रियंका घाटगे (राधानगरी) यांनी पोलिस उपनिरीक्षकपदासाठी यश मिळवले आहे.

12/04/24



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या गुणी विद्यार्थी गौरव समारंभात बोलताना कथाकथनकार आप्पासाहेब खोत. व्यासपीठावर प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी.

# विद्यार्थ्यांनी संस्कृती जपली पाहिजे : खोत

**कोल्हापूर :** यशस्वी होण्यासाठी मोठी स्वप्ने पाहिली पाहिजेत. तरुणाईमध्ये जग जिंकण्याची शक्ती आहे. मर्यादा लक्षात घेऊन एखादे क्षेत्र निवडल्यास यश नक्कीच मिळते. विद्यार्थ्यांनी मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जपली पाहिजे, असे प्रतिपादन कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या गुणी विद्यार्थी गौरव समारंभात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. याप्रसंगी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविलेल्या कला, क्रीडा, सांस्कृतिक, एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एस. एस. कुंडले यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सहिदा कच्छी यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, प्रा. संजय थोरात, प्रा. एन. आर. सणगर, डॉ. आरिफ महात, सुनीता भोसले उपस्थित होते.

01/04/24

पुढारी | संमिश्र | कोल्हापूर, बुधवार, २४ एप्रिल २०२४

# अमेरिकेतील दहा विद्यापीठांत अनिश जाधव यांची निवड



कोल्हापूर : अनिश प्रवीण जाधव यांची अमेरिकेतील दहा विद्यापीठांत अभियांत्रिकी पदवी शिक्षणासाठी राज्यातून निवड झाली आहे. अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय दर्जाची मिशिगन स्टेट, पेनसिल्व्हेनिया, सॅन डीभेगो, ह्युस्टन, रोचेस्टर, कॅलिफोर्निया स्टेट लॉगबीच, कॅलिफोर्निया स्टेट नॉर्थरीज, सॅन फ्रॅन्सिसस्को स्टेट, ॲरिझोना स्टेट व केंट स्टेट या उच्च दर्जा व संशोधनासाठी जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या या विद्यापीठांत जाधव यांची निवड झाली आहे. अनिश हा सेंट झेव्हिअर हायस्कूलचा गुणवंत व उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार प्राप्त असून, त्याने विवेकानंद महाविद्यालयातून बारावी केली आहे. अनिश हा कोल्हापूर येथे यापूर्वी कार्यरत असणाऱ्या आणि सध्या रत्नागिरीच्या जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. अनिता नेवसे-जाधव यांचा सुपुत्र आहे.

पुढारी
कोल्हापूर, मंगळवार, २ एप्रिल २०२४

संक्षिप्त



कोल्हापूर : दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमालेत बोलताना प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार. सोबत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी.

# व्यापक बदलासाठी विज्ञानाची कास प्रकडणे गरजेचे : डॉ. राजेंद्र कुंभार

**कोल्हापूर :** वास्तव जीवनात व्यापक बदल घडवायचा असेल तर विज्ञानाची कास पकडायला हवी, असे प्रतिपादन जयसिंगपूर कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमालेंतर्गत विज्ञान व तत्त्वज्ञान विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. डॉ. कुंभार म्हणाले, शास्त्रज्ञ माणसांना पडणाऱ्या प्रश्नांचे उत्तर शोधण्याचे काम करतात. धर्मावर टीका केली की तुम्ही धर्मद्रोही ठरता. विज्ञानात मागच्या संशोधकावर टीका केली की तुम्ही शास्त्रज्ञ ठरता. विज्ञानाची कल्पना करतो तो खरा शास्त्रज्ञ. प्रास्ताविक प्रा. दत्ता जाधव यांनी केले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. कैलास पाटील यांनी आभार मानले.

पुढारी MY कोल्हापूर रविवार, २८ एप्रिल २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये विल्यम शेक्सपिअर जयंतीनिमित्त कार्यक्रम

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातर्फे नाटककार व कवी विल्यम शेक्सपिअर यांच्या जयंतीनिमित्त 'ए ट्रिब्यूट टू विल्यम शेक्सपिअर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. आर. कुंभार होते. कार्यक्रमात कला व वाणिज्य महाविद्यालयातील रितेश प्रजापती, मुस्कान मुल्ला, करण पाटील, समृद्धी कुलकर्णी, रश्मिता गौडा यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. शिल्पा भोसले, कला व वाणिज्य विभागप्रमुख प्राध्यापिका उज्ज्वला हिरकुडे, अश्विनी गायकवाड-माने, माधवी देशपांडे यांनी परिश्रम घेतले.

29/04/2024

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, ५ एप्रिल २०२४

# विक्रांत सुर्वेला कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक

**कोल्हापूर :** वारणानगर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजचा विक्रांत सुर्वे (बी.एस्सी.भाग-२) यास रौप्यपदक प्राप्त झाले. याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या वतीने गौरव चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन केले. त्याला जिमखाना विभाग प्रमुख हवालदार प्रा. एन.आर.सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.



पुढारी MY कोल्हापूर सोमवार, २९ एप्रिल २०२४

# इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरूकता अभियानास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद कॉलेजमधील वाणिज्य विभागामार्फत इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरूकता अभियान राबविण्यात आले. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

सध्याच्या इलेक्ट्रॉनिक कॉमर्सअंतर्गत येणाऱ्या विभिन्न गोष्टींमुळे सर्वसामान्य नागरिकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी करणे गरजेचे आहे, यासंदर्भात बी.कॉम. भाग-२ व बी.कॉम. भाग-३ च्या विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. यामध्ये एटीएम/ डेबिट / क्रेडिट कार्ड वापरताना कोणती दक्षता घ्यावी, मोबाईल बँकिंग व इंटरनेट बँकिंग वापरताना कोणती दक्षता घ्यावी, सोशल मीडियाचा वापर व सायबर गुन्हेगारीबद्दल घ्यावयाची काळजी याची माहिती देण्यात आली.

अभियानांतर्गत कोल्हापूर शहर व जिल्ह्यातील ५६ गावांतील् १३०० पेक्षा जास्त कुटुंबांमध्ये जनजागृती करण्यात आली. अभियानाचे समन्वयक म्हणून डॉ. उमेश दबडे यांनी काम पहिले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व डॉ. श्रुती जोशी यांचे विद्यार्थ्यांना जनजागृतीसाठी मार्गदर्शन लाभले.

सकाळ
कोल्हापूर, बुधवार, १७ एप्रिल २०२४

# जिल्ह्यातील जमादार, पाटील, कांबळे चमकले

## यूपीएससीमध्ये राज्यातून मोटवानी प्रथम

सकाळ वृत्तसेवा


फरहान जमादार

कोल्हापूर, ता. १६ : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत येथील फरहान इरफान जमादार, साळशी (ता. शाहूवाडी) येथील आशिष पाटील आणि उत्तूर (ता. गडहिंग्लज) सुकन्या वृषाली संतराम कांबळे यांनी यश मिळविले. फरहान यांना १९१, आशिष यांना १४७, तर वृषाली यांना ३१० गुणवत्ता क्रमांक मिळाला.

याशिवाय कचरवाडी (ता. इंदापूर) येथील शामल कल्याणराव भगत, यशवंत मंगेश खिलारी, सागर भामरे व सिद्धार्थ तगड यांनीही यश मिळवले


आशिष पाटील


वृषाली कांबळे

असून, ते विद्या प्रबोधिनीचे स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी आहेत. फरहान व शामल यांच्या यशाने प्रि-आयएएस ट्रेनिंग सेंटरमध्ये गुलालाची उधळण करत दोघांचे अभिनंदन करण्यात आले.

### कष्टाचे सार्थक - फरहान

फरहान म्हणाले, 'मी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करावा, अशी वडिलांची इच्छा होती. त्यामुळे पदवीनंतर लगेच अभ्यासाला सुरुवात केली. तीन प्रयत्नांत

पान ९ वर >

# जिल्ह्यातील जमादार, पाटील, कांबळे चमकले

> पान १ वरून

अपयश आल्यानंतर चौथ्या प्रयत्नांत कसून अभ्यास केला. आज कष्टाचे सार्थक झाल्याचा आनंद आहे. चांगल्या योजना लोकांपर्यंत पोचविण्यासाठी कार्यरत राहणार आहे.'

ताराबाई पार्क, कारंडे मळा येथील असून, चौथ्या प्रयत्नात त्यांना यश मिळवले. त्यांचे शालेय शिक्षण सुसंस्कार हायस्कूलमधून झाले. त्यांना दहावीला ९२ टक्के गुण होते. त्यांनी विवेकानंद महाविद्यालयातून बारावी (८० टक्के) केले. तेथून सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून 'कम्प्युटर सायन्स अँड इंजिनियरिंग'ची पदीव घेतली. त्यांनी २०२० मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा अभ्यास सुरू केला. स्वयंअध्ययन आणि विद्या प्रबोधिनीचे संचालक राजकुमार पाटील यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. त्यांचे वडील प्रिंटिंग प्रेसमध्ये कामाला असून, आई शमीम गृहिणी आहेत.

### उत्तूरमध्ये आतषबाजी

उत्तूर : उत्तूर गावची सुकन्या वृषाली संतराम कांबळे यांनी २५ व्या वर्षी पहिल्या प्रयत्नात यश मिळविले. त्यांना ३१० वा क्रमांक मिळाला. आजरा, चंदगड, गडहिंग्लज उपविभागातील त्या पहिल्या आयएएस ठरल्या आहेत. त्यांच्या यशाने उतूर गावच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.


सिद्धार्थ तागड


सागर भामरे

उतूर येथील मिलिंदनगरमध्ये राहणारे संतराम कांबळे नोकरी निमित्त नवी मुंबई येथील नेरूळमध्ये स्थायिक आहेत. वृषाली यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत जाण्याचे ध्येय बाळगून वाटचाल केली. मुंबईतील सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये त्यांनी राज्यशास्त्र विषयातून पदवी घेतली. त्यांनी बारावी वाणिज्य शाखेतून (९० टक्के) केले. प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी त्यांनी कला शाखेतून पदवी घेताना राज्यशास्त्र विषय निवडला. पदवी पूर्ण झाल्यानंतर त्याने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. बार्टीची शिष्यवृत्ती मिळाली. यूपीएससीच्या तयारीसाठी त्यांनी दिल्ली गाठली. कोरोना काळात त्यांना यश आले नाही तरीही नाउमेद न होता त्यांनी ध्येय साध्य करण्यासाठी जोमाने अभ्यास सुरू केला. त्यांच्या यशाची माहिती मिळताच मिलिंदनगरमध्ये नागरिकांनी फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा केला.

### पुन्हा स्वतःला सिध्द केले!

बांबवडे : साळशीतील आशिष


यशवंत खिलारी


शामल भगत

पाटील हे सध्या राजस्थान केडरमध्ये आयपीएस म्हणून रुजू आहेत. त्यांनी २०२१ मध्ये याच परीक्षेत ५६३, २०२२ मध्ये ४६३ तर आज १४७ वी गुणवत्ता प्राप्त केली. त्यांचे वडील अशोक पाटील प्राथमिक शिक्षक, तर आई गृहिणी आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण पिरवाडी येथे झाले. ते चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात तिसरे आले होते. सुपात्रे येथील दि न्यू इंग्लिश स्कूल येथे पाचवी ते सातवी तर आठवी ते दहावीचे शिक्षण महात्मा गांधी उच्च व माध्यमिक विद्यालय (बांबवडे) येथे पूर्ण केले. त्यानंतर पुणे येथे करून बी.टेक. करून स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. दिव- दमण या केंद्रशासित प्रदेशात उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी आयएएसची तयारी सुरू केली. गेल्या वर्षी त्यांना आयपीएस म्हणून राजस्थान केडर मिळाले होते. त्यानंतरही त्यांनी अभ्यास सुरूच ठेवून आजचे यश मिळविले. आता ते आयएएस म्हणून नियुक्त होतील.

" या दोन महिन्यांमध्ये गावच्या स्नेहराज देसाई यांची पीएसआयपदी वर्णी लागली. आदित्य बामणे यांची सहायक गटविकास अधिकारीपदी निवड झाली आणि आता वृषाली यांनी यशाचे शिखर गाठले. उत्तूरवासीयांसाठी हा आनंदाचा क्षण आहे.
**- किरण आमणगी,** सरपंच

" वृषाली यांनी जिवतोड मेहनत केली. त्याचे आज चीज झाले. त्यांचे यश उत्तूरमधील युवा वर्गाला निश्चितच प्रेरणा देईल.
**- संतराम कांबळे** (वडील)

" यशात आई-वडिलांचा मोठा वाटा आहे. ध्येय साध्य होण्याबरोबर कौटुंबिक तसेच मार्गदर्शकांच्या कष्टाचे चीज झाले.
**- वृषाली कांबळे.**

" सुरुवातीला मिळालेल्या यशात समाधानी न होता त्यांनी पुन्हा प्रयत्न केले. जिद्दीने अभ्यास करून आज त्यांनी पुन्हा स्वतःला सिद्ध करून दाखविले.
**- अशोक पाटील,** वडील

18/04/24

18.4.24

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, १३ एप्रिल २०२४

# जल्लोषात रंगला विवेकानंद महोत्सव

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : मिस्टर विवेकानंद किताब ऋषिकेश शिंदे, तर मिस विवेकानंदचा किताब प्रणाली सूर्यवंशी हिने पटकावला. त्यांच्यासमवेत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व अन्य मान्यवर.

कोल्हापूर, ता. १२ : विवेकानंद महोत्सवात अभिवाचन, एकपात्री, शॉर्ट फिल्म मेकिंग, आदी स्पर्धा घेण्यात आल्या. उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. सध्याचा काळ कौशल्य विकासाचा असून, अशा काळात विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी स्पर्धेमध्ये सहभागी होणे महत्त्वाचे असल्याचे डॉ. कुंभार यांनी सांगितले.

दरम्यान, फूड फेस्टिव्हलमध्ये वेगवेगळ्या पदार्थांचा खवय्यांनी मनसोक्त आस्वाद घेतला. मिस्टर अँड मिस विवेकानंद स्पर्धा जल्लोषात झाली.

स्पर्धांचे समन्वयक म्हणून डॉ. प्रदीप पाटील, प्रा. एच. व्ही. चामे, ए. एस. महात, पल्लवी देसाई, सनी काळे यांनी जबाबदारी सांभाळली. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी आभार मानले.

## विविध स्पर्धेंतील विजेते असे

विदिरा विभुते व साक्षी कुलकर्णी, प्रतिज्ञा पालकर, ऋषी डोंगरे व सुयश झुणके (अभिवाचन स्पर्धा), प्रज्ञा कुलकर्णी, साक्षी चोथे, प्रांजल जाधव (एकपात्री), अनुज पुनवतकर, पायल लांडगे, चेतन हेगाडे (शॉर्ट फिल्म मेकिंग), मुस्कान जमादार व शिवम काटकर, नाझिया देसाई व इंद्रायणी भांदिगरे, दीपक गावडे व रसिका गायकवाड (नावीन्यपूर्ण संशोधन). मिस्टर विवेकानंद किताब : ऋषिकेश शिंदे (बी.एस्सी. भाग-१), तर मिस विवेकानंद किताब : प्रणाली सूर्यवंशी (बी.ए. भाग-२).

तरुण भारत संवाद सोमवार, १५ एप्रिल २०२४

### विवेकानंद कॉलेज

भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रा. एच. व्ही. चामे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे तरूणांनी आचरण केले पाहिजे, असे सांगितले. यावेळी प्रा. समीक्षा फराकटे, आर. बी. जोग, सुनिता भोसले, प्रा. जे आर. भरमगोंडा, डॉ. कैलास पाटील, डॉ. संजय अंकुशराव, प्रा. एम. ए. कुरणे आदी उपस्थित होते.

15/04/24